# शेती पुरक दाळ प्रक्रीया व्यवसाय निर्मिती



**उद्योजक शेतकरी महीलेचे नाव : श्रीमती. साधना सतिश सराड**

पत्ता : मु.पो.सारफळी, ता. बाभुळगांव जिल्हा: यवतमाळ

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ८६०५४२५५०७, ९०४९१९१६२७

वय : ४२ वर्ष

शिक्षण : १२ वी पास

जमीन धारकता : ५ एकर

## १. कृषि विज्ञान केंद्राचे दाळ प्रक्रीया उदयोग व्यवसायाकरीता मार्गदर्शन

श्रीमती साधना सतिश सराड पारंपारीक पध्दतीने शेती करत असतांना शेतीमध्ये कापूस, सोयाबीन, तुर, हरभरा या पिकाची प्रामुख्याने लागवड करत होती. शेती करत असतांना कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसे, याकरीता माझी आर्थीक मदतीकरीता शेती पुरक व्यवसाय करण्याची इच्छा असायची. त्याकरीता मी गावामध्ये महिला शेतकरी बचत गटाची स्थापना करून, त्यामधुन पैश्याची बचत करावयास सुरवात झाली.

कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळच्या माध्यमातुन जानेवारी २०१६ या कालावधीत दाळ प्रक्रिया उद्योग या विषयी प्रशिक्षण व सखोल माहिती घेवुन मी दाळ प्रक्रिया उद्योग करण्याचा मानस केला. कृषि विज्ञान केंद्राच्या तांत्रीक मदतीने व शासकीय योजने अंतर्गत दाल मिल यंत्र घेण्याचा निश्चय करून मी माझ्या कार्यास सुरवात केली.

## २. दाळ प्रक्रीया उदयोग व्यवसायातून साध्य

गटाच्या माध्यमातून उपलब्ध असलेले खेळते भांडवल रू. ५४०००/— भरून दाल मिल यंत्र खरेदी केली. त्यामध्ये गटास रू. ४००००/— अनुदान मिळाले. तसेच शेड करीता रू. ४००००/— ते रू. ५००००/— अंदाजीत खर्च केला. एकुण रू. ९४००० ते रू. १०४०००/— अंदाजीत खर्च आला.

दाळ ही शेंद्रीय पध्दतीने करावयाचा निश्चय करून दाळ प्रक्रियेचे सुरवात गटामार्फत माहे मे— २०१६ मध्ये सुरू केली. सुरवातीस रू. ४००/— प्रति क्विंटल दर आकारून दाळ बनवुन देण्यास सुरवात केली. यामध्ये वर्षाकाठीस १०० क्विंटल दाळ तयार करून देण्यात आली. त्यामध्ये लाईट बिल, मजुरी, तेल या करीता रू. १५ ते २० हजार मजुरी खर्च येवुन त्यामध्ये रू. २० ते २५ हजार गटास फायदा झाला.

वर्ष २०१७—१८ यामध्ये एकंदरीत ९० क्विंटल दाळ वर्षाअखेरीस रू. ४०० दर आकारून शेतकऱ्यांची दाळ काढण्यात आली. यामध्ये एकुण रू. ३६ हजार चे उत्पन्न गटास झाले. त्यामध्ये मजुरी खर्च, किरकोळ खर्च, तांत्रीक खर्च रू. २० ते २५ हजार वजा करता रू. ११ ते १६ हजार उत्पन्न झाले.

वर्ष २०१८–१९ मध्ये गटाच्या माध्यमातुन शेतकरी तुर उत्पादक बांधवाकडुन शेंद्रीय तुरी विकत घेवुन रू. ५००० प्रति क्विंटल या दराने १० क्विंटल तुरी विकत घेवुन रू. ५० हजाराचे भांडवल गुंतवणुक केली व त्यापासुन स्वत: गटाने दाळ तयार करून त्यापासून ८ क्विंटल दाळ मिळाली स्वत: विक्री व्यवस्था करून रू. ९० किलो या दराने विक्री करून रू. ७२ हजार उत्पन्न मिळकत केली. त्यामध्ये मजुरी, लाईट बिल, तेल व किरकोळ खर्च रू. ३ ते ४ हजार वजा करता निव्वळ नफा रू. १९ ते २० हजार गटास मिळाला.

**दाल मिल यंत्र उत्पादन क्षमता प्रति दिवस:**

| उत्पादन | विवरण | अंदाजीत दर |
|---|---|---|
| लागणारी तुर | ८ क्विंटल | ६४००० |
| विजेचा खर्च | २० युनिट प्रति दिवस | २०० |
| तेलाचा खर्च | ३.५ किलो | २६० |
| मजुरी खर्च | २ मजुर (महिला) | ४०० |
| किरकोळ खर्च | | ३०० |
| **एकुण** | | **६५१६०** |

**उत्पादन प्रतिदिन रूपयांत:**

| मिळणारे उत्पादन | विवरण | रूपये |
|---|---|---|
| तुरदाळ | ६ क्विंटल | ७८००० |
| चुरी | ०.२ क्विंटल | १००० |
| भुशी व टरफले | १.६ क्विंटल | २४०० |
| **एकुण** | | **८१४००** |

उपरोक्त प्रति दिनाचा एकुण किरकोळ खर्च वजा करता एकुण रू. १५४४० प्रतिदिवस याप्रमाणे गटास उत्पादन मिळते हे उत्पादन मार्च ते मे या दोन महिन्याच्या कालावधीमध्ये गटास उत्पन्न मिळते.

**दाल मिलचे वैशिष्टये:**

१. दाळीच्या चुरी, टरफले व पावडर तयार करता येते.
२. देखभालीचा खर्च अत्यल्प.
३. ग्रामीण स्तरावर स्वयंरोजगारास उपयुक्त.
४. तेलाच्या प्रक्रियेची स्वतंत्र व्यवस्था.
५. धान्याची यंत्रामार्फत प्रतवारी करता येते.
६. दाळीचा उतारा ७५ ते ८० टक्के मिळतो


हिरकणी महिला शेतकरी गट
सारफळी, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ
हिरकणी दालमिल
तर्फे
जागतिक बँक अर्थसहाय्यीत
महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प
काढणी पश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रात्यक्षिक
२०१६-२०१७
दाल मिल


हिरकणी महिला शेतकरी गट
दाल मिल


Mob:- 8605425507
तुरदाळ
हिरकणी महिला शेतकरी गट, सारफळी


Mob:- 8605425507
तुरदाळ
हिरकणी महिला शेतकरी गट, सारफळी